"जीवन सुंदर करु या"

# "हेल्पिंग हँड्स"

Website - www.helpinghandsngo.net
Email - helpinghandskop@gmail.com

नोंदणी क्र. - महाराष्ट्र /२३२/२०१०/अ.नगर.
एफ - १२१२१
द्वारा - सीए. दत्तात्रय बी. खेमनर
चंद्रबन कॉम्प्लेक्स, बँक रोड,
कोपरगांव - ४२३ ६०१, जि. अ.नगर. (महाराष्ट्र)
मो. 9595383916, 9527698393, 9822818088

*"Helping hands for growing together"*

दि. १३/५/२०२४

मित्रांनो,

या वर्षी आपण हेल्पिंग हँड्स या आपल्या संस्थेमार्फत ५० गरीब व होतकरू व हुशार विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यासाठी एकूण रूपये १० लाखाच्या मदतीचे नियोजन करीत आहेत व त्यामुळे आपली आजपावेतो एकूण मदत ६४ ते ६५ लाख रुपये होईल. आपणा सर्वांच्या शुभेच्छा व सहकार्याने तेआपण पूर्ण करू हा विश्वास आहेच.

आपण वर्षभरामध्ये कधीही हेल्पिंग हँड्स या संस्थेला मदत करू शकता. आपणास जसे शक्य असेल त्याप्रमाणे किंवा

दिवसाला एक रुपया याप्रमाणे रुपये ३६५/- दिले तरी चालतील. किंवा आपण खालील प्रसंगी संस्थेस मदत करू शकता -

१) जेव्हा आपल्या घरातील कोणाचा वाढदिवस असेल.
२) गत ज्येष्ठांचा स्मृतिदिन असेल.
३) आपल्या मुलांचे परीक्षेतील यश असेल.
४) आपल्या मुला-मुलींचे शुभमंगल असेल.
५) आपला सेवा निवृत्तीचा क्षण असेल.

त्यावेळेस आपण संस्थेस आपल्याला शक्य असेल त्याप्रमाणे मदत करू शकता.आपली मदत आपण गुगल पे किंवा फोन पे ने पण पाठवू शकता.आपणास देणगी पावती लगेचच आपल्या व्हाट्सअप नंबर वर पाठवली जाईल.

**संस्थेचा बँक खाते तपशील खालील प्रमाणे -**

| | | |
|---|---|---|
| संस्थेचे नाव | : | **हेल्पिंग हँड्स** |
| बँक | : | **बँक ऑफ बरोडा** |
| शाखा | : | **कोपरगाव** |
| बचत खाते क्रमांक | : | **04560100018895** |
| आयएफएससी कोड | : | **BARB0KOPERG** (पाचवे अक्षर शून्य आहे.) |

तसेच खालील बँक खात्यात पण आपण पैसे भरू शकता.

| | | |
|---|---|---|
| Name | - | **Helping Hands** |
| Bank | - | **IDFC Bank** |
| Branch | - | **Kopargaon ,** |
| S.B. A/c. No. | - | **10158036920** |
| IFSC Code | - | **IDFB0042966** |

आपण दिलेल्या पैशाचा उपयोग अत्यंत चांगल्या कामासाठी होत आहे. संस्थेच्या कामावरती विश्वसा ठेऊन काही दानशूर व्यक्तींनी रु. ५ लाखाच्या कायम स्वरुपी ठेवी ठेवलेल्या असून त्याचे व्याज आपण दरवर्षी विद्यार्थ्यांना मदत देण्यासाठी वापरतो. इतरांचे आयुष्य उभे करण्यासाठी आपला थोडासा का होईना हातभार लागेल. हे दान कुठल्या रूपाने आपल्या आयुष्यात मदतीला येईल हे सांगता येत नाही आणि शेवटी हे महत्त्वाचे आहे की धन हे दानानेच वाढते.

आपणास शक्य नसेल तर आपण वरील प्रसंगी आपल्या मित्रमंडळीला मदत करण्यासाठी सुचवू शकता व संस्थेस अप्रत्यक्षरीत्या मदत करू शकता. तसेच आपल्या संस्थेची माहिती इतर ग्रुपवर शेअर करून संस्थेसाठी मदत करू शकता, तसेच आपल्या परीचयातील परंतु संस्थेच्या शैक्षणिक मदत देण्याच्या अटी पूर्ण करू शकणाऱ्या मुलांची नावे पण आपण सूचवू शकता. तसेच ही माहिती आपण इतर ग्रुप वर पण पाठवू शकता.

आपला स्नेहांकित,

**सीए. दत्ता खेमनर**

अध्यक्ष, हेल्पिंग हँड्स, कोपरगाव.
Phone - 02423-223645
Mobile - 9527698393
9595383916
9822818088
E-mail - helpinghandskop@gmail.com
Website - www.helpinghandsngo.net.in

डिजीटल वर्ल्ड अक्षर 8888203019

"जीवन सुंदर करु या"



# "हेल्पिंग हँड्स"

Website - www.helpinghandsngo.net
Email - helpinghandskop@gmail.com

नोंदणी क्र. - महाराष्ट्र /२३२/२०१०/अ.नगर.
एफ - १२९२१

**द्वारा - सीए. दत्तात्रय बी. खेमनर**
चंद्रबन कॉम्प्लेक्स, बँक रोड,
कोपरगांव - ४२३ ६०१, जि. अ.नगर. (महाराष्ट्र)
मो. 9595383916, 9527698393, 9822818088

*"Helping hands for growing together"*

दि. १३/५/२०२४

विद्यार्थ्यांना मदत देतांना आपण आवश्यक ती फॉर्म भरून व योग्य कागदपत्रे घेऊन व शिक्षण घेतलेल्या उच्च / माध्यमिक विद्यालयाची शिफारस घेऊनच मदत देतो. आर्थिक परिस्थिती व मेरीट या दोन गोष्टींवरच विद्यार्थ्यांची पारदर्शक निवड केली जाते. कुणाची ओळख, शिफारस, वशिला या बाबींना आमचेकडे अजिबात थारा दिला जात नाही. कारण आपण मोठ्या विश्वासाने दिलेला पैसा, हा योग्य कारणासाठी व पारदर्शकपणे वापरणे आम्ही महत्वाचे मानतो. आपण आपली मदत रोख / चेक / ऑनलाईन / डी.डी./ गुगल पे / फोन पे ने वरील पत्त्यावर पाठवू शकता किंवा संस्थेच्या खात्यात ऑनलाईन भरू शकता व तसे संस्थेला कळविल्यास आपली देणगी पावती आपणास पाठविण्यात येईल. आपण सर्वजण मुलांचे शिक्षण, वाढदिवस किंवा हौसेसाठी खर्च करतोच त्यातील १% मदत जरी आपण आपल्या संस्थेला दिली तर समाजातील हुशार, आर्थिकदृष्ट्या गरीब व होतकरू मुलांचे विश्व निकोप करण्यासाठी आपण खूप काही करू शकू, असा विश्वास वाटतो.

**" धन दिल्यानेच वाढते "**

**संस्थेचे विविध नोंदणी क्रमांक -**

१) सोसायटी कायदा १८६० अंतर्गत नोंदणी क्र. : महा/२३२/२०१०/अ.नगर
नोंदणी दि. २६ मार्च २०१०.

२) बॉम्बे पब्लिक ट्रस्ट अॅक्ट १९५० अंतर्गत नोंदणी क्र.: एफ - १२९२१
नोंदणी दि. १६ ऑगस्ट २०१०.

३) स्थायी खाते क्रमांक (PAN): AABTH 0284 L.

४) कर कपात खाते क्रमांक (TAN): PNEH 06983 E.

५) आयकर कायदा १९६१ च्या कलम १२ अब (12AB) अंतर्गत नोंदणी क्र.: AABTH0284LE20214
दि. ३१ मे २०२१ पासून लागू.

६) DARPAN Unique ID : MH/2021/0286264
नोंदणी दि. १५ ऑगस्ट २०२१.

७) आयकर कायदा १९६१ च्या कलम ८०जी (80G) अंतर्गत नोंदणी क्र.: AABTH 0284LF20211
दि. १६ ऑक्टोबर २०२१ पासून लागू.

८) संकेतस्थळ : www.helpinghandsngo.net.in

९) ई-मेल : helpinghandskop@gmail.com

१०) सीएसआर नोंदणी : CSR00030876
w.e.f. 25/08/2022

**आयकर कलम ८०जी (80G) अंतर्गत देणगी कर सवलतीस पात्र**

येथून पुढे आपण हेल्पिंग हँड्स या संस्थेला दिलेल्या देणग्या ८०जी (80G) कर सवलतीस पात्र आहेत. त्यामुळे रु. २०००/- पर्यंतची देणगी रोख स्वरूपात चालेल, परंतु रु. २०००/- पुढील देणगी अकाउंट पेयी चेक, ऑनलाईन ट्रान्सफर, डी.डी., आर.टी.जी.एस, एन.ई.एफ.टी., गुगल पे, फोन पे या माध्यमातूनच द्यावी लागेल.



आपला स्नेहांकित,
**सीए. दत्तात्रय बी. खेमनर**
अध्यक्ष
हेल्पिंग हँड्स, कोपरगाव.

डिजीटल वर्ल्ड अक्षर 8888203019

''जीवन सुंदर करु या''

# ''हेल्पिंग हँड्स''

Website - www.helpinghandsngo.net
Email - helpinghandskop@gmail.com

नोंदणी क्र. - महाराष्ट्र /२३२/२०१०/अ.नगर.
एफ - १२१२१
**द्वारा - सीए. दत्तात्रय बी. खेमनर**
चंद्रबन कॉम्प्लेक्स, बँक रोड,
कोपरगांव - ४२३ ६०१, जि. अ.नगर. (महाराष्ट्र)
मो. 9595383916, 9527698393, 9822818088

*"Helping hands for growing together"*

दि. १३ मे२०२४

मित्रहो,

आपण हेल्पिंग हँड्स या संस्थेच्या माध्यमातून गरीब होतकरू व हुशार मुलांना उच्च शिक्षणासाठी होस्टेल फी किंवा मेस बिल भरण्यासाठी प्रत्येकी रू २०,०००/- ची मदत करत असतो.

बारावीला ७५% पेक्षा जास्त मार्क्स असलेला मुलगा किंवा मुलगी आपल्या माहितीतील असल्यास त्यांना **www.helpinghandsngo.net** या वेबसाईटवरून अर्ज डाउनलोड करून भरून दि. १०.०८.२०२४ पर्यंत संस्थेच्या पत्त्यावर पाठविण्यास सांगावे.

सदरचा मुलगा महाराष्ट्रातील रहिवाशी असावा व आर्थिक परिस्थिती गरिबीची व ७५% पेक्षा बारावीला जास्त मार्क्स असावेत.

सदरचा फॉर्म भरून व आवश्यक त्या कागदपत्रासह पीडीएफ मध्ये **helpinghandskopgmail.com** या मेल वर पाठवले तरी चालतील.

संस्थेने आजपावतो गरीब होतकरू व हुशार विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी ५३ लाख ९२ हजारांची मदत केलेली आहे. या वर्षी ५० मुलांना प्रत्येकी रू २०,०००/- प्रमाणे १० लाख मदत देण्याचे ठरविण्यात आलेले आहे. गरज पडल्यास संस्थेमार्फत प्रत्यक्ष परिस्थिती तपासूनच मदत दिली जाते. त्यामुळे गरजू विद्यार्थ्यांनीच अर्ज करावेत. संस्थेमार्फत होस्टेल फी किंवा मेस बील भरण्यासाठीच मदत दिली जाते. डोनेशन भरुन प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी कृपया अर्ज करु नयेत ही विनंती.

अभियांत्रिकी शाखेमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्याला प्रवेश परीक्षेतही किमान २०० पैकी १५० च्या पुढे गुण असले पाहिजे व मेडीकल शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांस प्रवेश परिक्षेतही किमान ७२० पैकी ५०० च्या पुढे गुण पाहिजेत.

आपला स्नेहांकित,
**सीए. दत्तात्रय बी. खेमनर**
अध्यक्ष
हेल्पिंग हँड्स, कोपरगाव.

डिजीटल वर्ल्ड अक्षर 8888203019